Vol 5 Issue 5 Feb 2016

ISSN No : 2249-894X

Monthly Multidisciplinary Research Journal

# Review Of Research Journal

Chief Editors

**Ashok Yakkaldevi**
**A R Burla College, India**

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

**Welcome to Review Of Research**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2249-894X**

Review Of Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## *Advisory Board*

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Fabricio Moraes de AlmeidaFederal
University of Rondonia, Brazil

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Xiaohua Yang
University of San Francisco, San Francisco

Karina Xavier
Massachusetts Institute of Technology (MIT), USA

May Hongmei Gao
Kennesaw State University, USA

Marc Fetscherin
Rollins College, USA

Liu Chen
Beijing Foreign Studies University, China

Mabel Miao
Center for China and Globalization, China

Ruth Wolf
University Walla, Israel

Jie Hao
University of Sydney, Australia

Pei-Shan Kao Andrea
University of Essex, United Kingdom

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Ilie Pintea
Spiru Haret University, Romania

Mahdi Moharrampour
Islamic Azad University buinzahra
Branch, Qazvin, Iran

Titus Pop
PhD, Partium Christian University,
Oradea,
Romania

J. K. VIJAYAKUMAR
King Abdullah University of Science &
Technology,Saudi Arabia.

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences
Al. I. Cuza University, Iasi

REZA KAFIPOUR
Shiraz University of Medical Sciences
Shiraz, Iran

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University,
Solapur

Nimita Khanna
Director, Isara Institute of Management, New Delhi

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

P. Malyadri
Government Degree College, Tandur, A.P.

S. D. Sindkhedkar
PSGVP Mandal's Arts, Science and
Commerce College, Shahada [ M.S. ]

Anurag Misra
DBS College, Kanpur

C. D. Balaji
Panimalar Engineering College, Chennai

Bhavana vivek patole
PhD, Elphinstone college mumbai-32

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut (U.P.)

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance
Education Center, Navi Mumbai

Sonal Singh
Vikram University, Ujjain

Jayashree Patil-Dake
MBA Department of Badruka College
Commerce and Arts Post Graduate Centre
(BCCAPGC),Kachiguda, Hyderabad

Maj. Dr. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

AR. SARAVANAKUMARALAGAPPA
UNIVERSITY, KARAIKUDI,TN

V.MAHALAKSHMI
Dean, Panimalar Engineering College

S.KANNAN
Ph.D , Annamalai University

Kanwar Dinesh Singh
Dept.English, Government Postgraduate
College , solan

More.........

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.ror.isrj.org**

# Review of Research

International Online Multidisciplinary Journal

ISSN: 2249-894X Impact Factor : 3.1402(UIF) Volume - 5 | Issue - 5 | Feb - 2016




## ‘भक्ती: स्वरूप व पार्श्वभूमी’


Lahare Maya Narayan

Assistant Professor, Dept. of Marathi, Ashok Gramin Shikshan Sanstha’s, Arts, commerce & Science College, Ashoknagar,Tal. Shrirampur, Dist. Ahmednagar.



*प्रास्ताविक*

‘भक्ती’ हा शब्द उच्चारताच आपणास ‘भक्तिकाव्य’, ‘भक्तिगीत’ आणि त्याअनुषंगाने भजन, पूजा, प्रार्थना, उपासना, आराधना हे सारे लक्षात येते. ‘भक्ती संकल्पना म्हणजे काय?’ याचा विचार करता ज्याविषयी व्यक्तीचा श्रद्धाभाव आहे, त्याचे गुणवर्णन करणे वत्याला अनन्यभावे शरण जाणे, असे ढोबळपण सांगता येते.

भक्ती संकल्पनेची मांडणी संत ज्ञानेश्वरांनी कशी केली आहे? ही संकल्पना त्यांच्या प्रभावळीतील नामदेवादी संतांच्या साहित्यातून कशी व्यक्त होते, याची उकल करण्याचा प्रयत्न या अभ्यासात केला आहे. संत ज्ञानश्वरांपूर्वीचे भक्तीचे स्वरुपही यानिमित्ताने अभ्यासले आहे. त्यासाठी ज्ञानेश्वरपूर्वकालीन साहित्यातून भक्ती ही संकल्पना अभ्यासण्यासाठी पूर्वीच्या विविध संप्रदायातील संत व आचार्यांची मते विचारात घ्यावी लागतात. त्यातून तत्कालीन पंथोपपंथांतील भक्तीचे स्वरुप लक्षात घेता येते.


### *1. ‘भक्ती’ स्वरूप व अर्थ*




प्रत्येक संकल्पनेला तिचा स्वतःचा असा अर्थ असतो. त्यातून ती संकल्पना स्पष्ट होते. ‘भक्ती’ च्या संदर्भात असा अर्थ संकल्पनेचाही आहे. “व्यक्ती ज्या भावनेच्या योगाने ईश्वराला सर्वथा शरण जाते, ती भावना म्हणजे भक्ती होय. ईश्वराविषयीचे आत्यंतिक व अनन्य प्रेम म्हणजे ईश्वराची भक्ती, असेही म्हणता येईल.”[01] ईश्वराची प्राप्ती करून घेण्याचे जे अनेक मार्ग आहेत त्यापैकी भक्ती हा एक मार्ग आहे. ईश्वराचे अस्तित्व मान्य करणाऱ्या व्यक्तीच्या मनात त्याचा अनुग्रह प्राप्त करून घेण्याची, त्याच्या साक्षात्काराची उत्कट इच्छा निर्माण होते, त्यातूनच त्याच्या मनात भक्तीची भावना स्फुरते. सृष्टीचा निर्माता असलेला सर्वव्यापक ईश्वरच आपला उद्धारकर्ता आहे, हा विश्वास मानवाच्या मनात भक्तीची सुरूवात करतो. अशाप्रकारच्या सर्वज्ञ आणि सर्वगुणसंपन्न ईश्वराची भक्ती करण्याची प्रथा जगातील सर्वच धर्म व संप्रदायात आढळून येते.

एकंदरीत भक्तीचे स्वरुप अशाप्रकारे विश्वव्यापी आहे. ख्रिस्ती व इस्लाम धर्मात भक्तीला महत्वाचे स्थान आहे, यहुदी व ज्यू धर्मियांतही भक्ती करण्याची परंपरा आहे. एवढेच नव्हे तर जैन, बौद्धादी अवैदिक आणि निरिश्वरवादी धर्मसंप्रदायात असलेला तीर्थंकर व बुद्धाविषयी असलेला पूज्यभाव हे भक्तीचेच प्रतीक आहे.

हिन्दू धर्माच्या संदर्भात भक्तीची प्राचीनता पाहू गेल्यास ती श्रीकृष्णावताराच्या पूर्वीही होती असे लक्षात येते. नारद, प्रल्हाद या भंगवंताच्या प्रसिद्ध भक्तांची नावे वेदोपनिषदांतून आढळतात. भारतात विविध आचार्यांनी भक्तीचे महत्त्व वाढविले आहे. रामानुजाचार्य, मध्वाचार्य, वल्लभाचार्य व निंबार्क आदी आचार्यांनी भक्तीला मोक्षमार्गाचे साधन मानलेले आहे. सूरदास व मीराबाई यांनी ईश्वरप्राप्तीसाठी भक्तीची कास धरली तर कबीरांनीही निर्गुण भक्तीचा पुरस्कार केला. याशिवाय विविध देवता किंवा त्याच्या अवताराची भक्ती करणारे अनेक संप्रदाय भारतात पहावयास मिळतात. या विवेचनावरून हे लक्षात येते की, ईश्वरप्राप्ती आणि मोक्षासाठी भक्ती हे साधन सर्व धर्म आणि संप्रदायात महत्त्वाचे मानले गेले आहे.

अशाप्रकारे भक्ती ही ईश्वरप्राप्तीसाठी केली जात असली तरी त्यासाठी काही कर्मकांडादी कार्ये केली जातात. वास्तविक कर्मकांडाला गौण समजणे भक्तीत अभिप्रेत असले तरी विविध संत, महात्म्यांचा व गुरूचा अनुग्रह, त्यांचा सहवास यास्तव पूजा, उपवास,

प्रसाद, तीर्थाटन, प्रार्थना, नामस्मरण अशाप्रकारची कर्मे भक्तीच्या निमित्ताने अनुसरली जातात.

### 01.01 'भक्ती' अर्थ

"भक्ती हा शब्द 'भज्' (सेवा करणे) या संस्कृत धातूपासून बनला आहे. भक्ती, भगवान, भागवत इ. शब्द त्याच धातूपासून बनले असून अर्थदृष्ट्या ते 'भक्ती' या शब्दांशी संबद्ध आहेत." [02] यावरून भक्ती याचा अर्थ सेवा करणे असा घेतला जातो आणि साहजिकच भक्त म्हणजे 'सेवा करणारा' असे म्हणता येते. ही सेवा ईश्वराची, संतांची गुरूची अशी कुणाचीही असू शकते.

श्री.व्यं.केतकर यांनी 'महाराष्ट्रीय ज्ञानकोशात' भक्ती या शब्दाचे अर्थविवेचन करताना "भक्ती हा शब्द 'भज' = भजणे या धातूपासून आला आहे, पण भक्ती याचा केवळ भजणे याचा केवळ भजने असा अर्थ न राहता ईश्वरोपासना या अर्थी तो शब्द रुढ झाला." [03] अशी नोंद आढळते.

'भज्' या मूळ धातूचा अर्थ 'सेवा करणे' असा आहे. ऋग्वेदात "महस्ते विष्णो सुमति भजामहे । असे म्हटले आहे. 'उपासना' म्हणजे 'पूजणे' किंवा 'पूजा करणे' असा अर्थ आहे. 'उपासना' हा जवळ बसणे यापासून तयार झालेला शब्द असून 'पूजेसाठी जवळ बसणे' असा अर्थ नंतर त्याला प्राप्त झाला असावा. उपासना व भक्ती हे शब्द समानार्थक मानले जातात."

'भक्ती' या शब्दाचे वेगवेगळ्या कोशातील अर्थ उपासना, पूजा, आराधना, दृढभाव, भजन–पूजन, प्रार्थना, सेवा, श्रध्दा, भावभक्ती, निष्ठा, पूज्यभाव, आसक्ती, अनुरक्ती, प्रीती, परायणता, ऐक्य, Devotion, Dedication, Prayer, Warship, Faith, असे आहेत.

### 01.02. भक्ती : व्याख्या

भक्ती या शब्दाचा अर्थ समजून घेतल्यावर काही व्याख्या अभ्यासल्यावर 'भक्ती' ही संकल्पना आणखी स्पष्ट होण्यास मदत होईल. या व्याख्या विविध ग्रंथात आढळून येतात.

'माहात्म्यज्ञानपूर्वस्तु सुदृढः सर्वतोऽधिकः।
स्नेहो भक्तिरिति प्रोक्तस्तया भुक्तिर्न चान्यथा ।।'
('म.भा.तात्पर्यनिर्णय', 1–86–107')

भगवंताच्या महात्म्याचे ज्ञान करून घेवून त्याचा स्नेह धारण करणे याला भक्ती असे म्हणतात.

'मनोगतिरविच्छिन्न हरौ प्रेमपरिप्लुता ।
अभिसन्धिविनिर्मुक्ता भक्तिर्विष्णुवशंकरी ।।'
('नारद पंचरात्र')

प्रेमाने प्लुत झालेल्या मनाची गती निःस्वार्थ होवून श्रीहरीच्या ठिकाणी अविच्छिन्नपणे वाहणे आणि निरंतर श्रीहरीचे ध्यान करणे म्हणजे भक्ती होय.

'द्रुतस्य भगध्दर्मात् धारावाहिकतां गता ।
सर्वेषे मनसो वृत्तिर्भक्तिरित्यभिधीयते ।।'
('भक्तिरसायण' 1.3)

मनाची वृत्ती आध्यात्मिक साधनेने द्रवीभूत होवून ईश्वराकडे प्रवाहित होणे, हिला भक्ती असे म्हणतात.

"स्वात्मतत्वानुसन्धानं भक्तिरित्यपरे जगुः ।।" [05] म्हणजे आत्मतत्वाचे अनुसंधान हीच 'भक्ती' होय, असे षंकराचार्यांचे मत आहे. रामानुजाचार्यांनी 'भक्ती म्हणजे परमेश्वराचे सतत ध्यान' अषी व्याख्या केलेली आहे. तर वल्लभाचार्य 'भगवान माहात्म्याचे ज्ञान झाल्यावर भगवानाविषयी जो सुदृढ आणि सर्वाधिक स्नेह असतो तीच भक्ती होय' असे प्रतिपादन करतात.

'ज्यावेळी प्रेम ईश्वरावर जडते त्यावेळी त्याला भक्ती असे म्हणतात', असे स्वामी विवेकानंद मानतात. "जेव्हा इंद्रियभोग्य वस्तूवर असलेले आपले पूर्वीचे प्रेम आपण ईश्वराला, त्या भगवंताला अर्पण करतो, तेंव्हा त्या प्रेमाला भक्ती असे म्हणतात.'' [06]

"मानवी जीवनात सार्वत्रिक असणारी, अज्ञात सत्याकडे वारेवार ओढ घेणारी, त्याच्या मिलनास उत्सुक झालेली, त्याच्याशी नाना प्रकारचे संबंध प्रस्थापित करू इच्छिणारी भय, आदर, जिज्ञासा, आत्मसमर्पण इत्यादी भावनांनी परिपुष्ट बनलेली मनाची जी अनुभवगम्य स्थिरवृत्ती बनते, तीस भक्ती हे नाव आहे." [07]

'भक्तीचिंन्तामणि' मध्ये भक्तीला ''योगवियोगवृत्तिप्रेम'' असे म्हटले आहे, तर 'भक्ती हृदयाची ती भावदशा आहे की जिच्यात भक्ताच्या हृदयात एकीकडे भगवंताच्या माहात्म्याकडे दृष्टी असते तर दुसरीकडे आत्मनिवेदन, आत्मसमर्पण, परा, श्रवण, कीर्तन, स्मरण, सेवा, अर्चन, वंदन, दास्य, सख्य आणि आत्मनिवेदन या नऊ भक्ती ची वैशिष्टे आहेत.'' [08]

विविध ग्रंथांमधील या व्याख्यांवरून हे स्पष्ट होते की, 'भक्ती' ही आध्यात्मिक विचारातील महत्त्वाची संकल्पना संज्ञा आहे. ती ईश्वराशी व त्याच्याविषयी निष्ठेशी संबंधित आहे. प्रेम, स्नेह, अनुसंधान, हरिचे निःस्वार्थ आणि सतत ध्यान करणे म्हणजे भक्ती असे यावरून स्पष्ट होते. मानवाच्या जीवनाचे सार्थक भक्तीच्या होते. ही भक्ती प्रेम, पूजा, विधी, यज्ञ, दान, तप, सन्यास अथवा निष्काम कर्म यातील कोणत्याही प्रकाराने असली तरी ती परमात्म्याशी तादात्म्य पावणारी असली पाहिजे.

### 02. भक्तीचा उगम आणि विकास

मानवाच्या उत्पत्तीपासूनच तो विशिष्ट नैसर्गिक शक्तीवर अवलंबून असलेला दिसतो. त्या शक्तीविषयी त्याच्या मनात एक प्रकारची

आदराची भावना असलेली दिसते. त्यातूनच विविध देवतांची निर्मिती झाली. "जगातील सर्व मानवसमूह फार प्राचीन काळापासून कोणत्या ना कोणत्या अतिमानवी शक्तीची भक्ती करीत आले आहेत. परंतु, अनेक पाश्चात्य विद्वान मात्र जगातील भक्तीचा पहिला आविष्कार ख्रिस्ती धर्मातच झाला असे मानतात. भारतीय लोकांनी भक्तीची संकल्पना ख्रिस्ती धर्मापासूनच घेतली, असेही त्यांचे मत आहे. परंतु, भारतीय विद्वांनांनी हे मत नाकारले आहे. काही विद्वानांनी भारतीय भक्तीसंप्रदायावर इस्लामचा प्रभाव असल्याचे मतही व्यक्त केले आहे. परंतु, इतर अनेक जणांच्या मते भारतातील भक्तीचा उगम हा स्वतंत्रपणे भारतीय भूमीतच झाला आहे." [09]

वास्तविक भक्तीचा उगम कोठे व कसा झाला, तसेच तिचा विकास कसा झाला, या संदर्भात भारतीय प्राचीन वाङ्मयात काही संदर्भ आढळतात का? हे पाहणे गरजेचे आहे. त्याप्रमाणे वेद, उपनिषद्, भगवद्गीता, श्रीमद्भागवत यांतून 'भक्ती संकल्पना' कशी साकारते ते या संदर्भात पाहवे लागते.

### *02.01 वेदातील भक्ती*

भारतीय संस्कृती ही धर्माधिष्ठित संस्कृती आहे. आध्यात्मिक विचार हा या संस्कृतीचा आत्मा आहे. आपल्याला अभिमान वाटावा असे जगातील सर्वात प्राचीनतम असे 'वेद' भारतीय आहेत. कोणत्याही संस्कृतीचे मूळ शोधत असतांना 'वेदांनाच ' प्रमाण मानले जाते.

"एखाद्या युगात एखाद्या सिध्दांताची उपोद्बलक सामग्री विद्यमान असते, पण त्या सिध्दान्ताचा नेमका निदर्शक शब्द मात्र निर्माण झालेला नसतो.......संहिता व ब्राह्मणे यांत प्रेमसूचक भक्ती या शब्दाचा सर्वथा अभाव आहे. पण या अभावामुळे वेदकालात भक्तीसिध्दान्ताची कोणाला कल्पनाच नव्हती, असे मानने अप्रस्तुत ठरेल." [11]

वैदिक वाङ्.मयात संहिता, ब्राह्मणे, आणि आरण्यके व उपनिषदे या चार प्रकारच्या ग्रंथांचा समावेश होतो. "ऋग्वेदात ऋषी आपल्या आराध्य देवतांशी फार सलगीने वागतात. कधी संततीसाठी तर कधी दिर्घायुष्यासाठी, कधी भौतिक सुखासाठी तर कधी अमृतत्त्वासाठी ते देवांना आळवितात." [10] परंतु, देवतेला आपणाकडे वळविण्यासाठी, तिला मोकळेपणाने आपल्या आशा–आकांक्षा सांगण्यासाठी व तिचा कृपा व प्रसाद मिळविण्यासाठी ते यज्ञमार्गाचा अवलंब करून देवतांना त्यांचा हविर्भाग अर्पण करून मधुर स्तोत्रगान करून सोमरसाने देवाला संतुष्ट करतात. अशावेळी भक्तीच्या प्रहर्षामध्ये भक्तांना देवाचे दर्शन होई. आपणाला यात त्यांची देवाण–घेवाणीची व्यवहार्य भावना जरी दिसत असली तरी ती एक प्रकारची भक्तीच आहे. तिला 'सकाम' भक्ती म्हटले जाते.

वेदकाळी भक्ती आहे. परंतु, तीचे स्थान उच्चकोटीचे नाही. तिला प्रतिष्ठा नाही असे दिसते. वेदकाळी भक्ती उपासनेच्या रूपात दिसते. पण तिचा परिघ मर्यादित होता. या उपासना सूक्तांच्या, ऋचांच्या रूपात होत्या. त्या संस्कृत भाषेत असल्याने त्या पठण करण्याचा अधिकार केवळ वेदपाठींचाच होत्या. सर्वसामान्य माणूस मात्र या अनाधिकाराने त्या अवगत करू शकत नव्हता. म्हणजेच या उपासना सर्वसमावेशक नसून विशिष्ट समाजघटकांची ताबेदारी त्यांच्यावर होती. "पुरोहित यजमानामार्फत देवांना आळवीत व यजमानाला अपेक्षित फळ मिळवून देत. सहाजिकच देवता व यजमान याच्यामधील पुरोहित हा दुवा बनला." [11]

### *02.02 उपनिषदातील भक्ती*

वेदकाळानंतरच्या ब्राह्मणकालात जटील कर्मकांडाचे, मंत्र–तंत्राचे महत्त्व वाढले होते. याविषयी उपनिषदातील तत्त्वज्ञान असे सांगते की, "यज्ञयागादी कर्मकांडाने मनुष्याचे चिरंतन कल्याण साधणारे नाही. त्याकरीता आत्मज्ञान करून घेऊन आत्मप्राप्ती ही करून घेतली पाहिजे व त्याकरीता चित्ताचा विरोध करून त्याचे दोष कमी करीत सत्याचा मार्ग आक्रमिला पाहिजे. या मार्गाने मनुष्य गेला म्हणजे त्याची उन्नती होत जाते व आत्मप्राप्ती होऊन तो खरा सुखी व आनंदी होतो.'' [12] उपनिषदांनी कर्मापेक्षा आत्मज्ञान होणे महत्त्वाचे मानले. उपनिषदांमध्ये 'भक्ती' हा शब्द फक्त श्वेताश्वतर उपनिषदात आढळतो. तो श्लोक खालील प्रमाणे

'यस्य देवे पराभक्तिर्यथा देवे तथा गुरौ।
तस्यैते कथिता हयर्थाः प्रकाषन्ते महात्मनः।।'
('श्रीमद्भगवद्गीता 'अध्याय 6 श्लोक 23)

ज्या उदार पुरूषाची देवावर व गुरूवर भक्ती असते, त्यासच या सांगितलेल्या गोष्टींचे यथार्थ ज्ञान होते. अषाप्रकारे 'परमात्माभक्ती' आणि 'गुरूभक्ती' यादोन्ही गोष्टी उपनिषदात सांगितलेल्या आहेत. ''परमेश्वराला शरण जाणे व त्याच्याबद्दल कौतुक व्यक्त करणे यांचे महत्त्व या श्वेताश्वेतर उपनिषदात दाखविण्यात आले आहे. यास्तव हे उपनिषद म्हणजे भक्तिपंथाचे प्रवेशव्दारच आहे." [13]

### *02.03 श्रीमद्भगवद्गीतेतील भक्ती*

'श्रीमद्भगवद्गीतेत' भक्तीचे स्वरूप व महत्त्व यांचे वर्णन केलेले आहे. भक्तीला आवश्यक अशा सगुण परमात्म्याच्या प्रेमरूपाचेही वर्णन आहे. "सर्वांना आचरण्याला सुलभ असे भक्ती हे मुक्तीचे साधन आहे. ज्ञानयोग किंवा पातंजलयोग हे सर्वांनाच आचरिता येण्यासारखे नसल्यामुळे बहुजन समाजाचे समाधान होईल व त्यांचे आयुष्य शुध्दतर करीत अशा रीतीच्या एखाद्या सुलभ साधनाची आवश्यकता होती....... वैदिक धर्मातील ही उणीव भक्तिमार्गाचा उपदेश करून गीतेने भरून काढली." [14] वास्तविक पाहता प्राचीन वैदिकांच्या प्रार्थना या भक्ती भावाने ओथंबलेल्याच आढळतात. परंतु, या प्रार्थना याज्ञिक कर्मकांडाशी जोडल्यामुळे शुध्द भक्तिभाव दिसेनासा झाला होता. "वैदिक देवतांचे पौराणिक देवतात रूपान्तर झाल्यानंतर यज्ञयागविरहीत अशा भक्तीचे पुनरूज्जीवन करण्यात आले......परमेश्वराची उपासना करून, मनन आणि निदिध्यासन करून आणि वर्णधर्मप्राप्त सर्व कर्मे त्यालाच अर्पण करून मनुष्याने त्याची प्राप्ती करून घ्यावी. असा या भक्तियोगाचा संदेश आहे."

गीतेने सर्वसमावेशक भक्तीमार्ग प्रतिपादिला आहे. त्याच मार्गाचा अवलंब करून मध्ययुगीन काळात महाराष्ट्रात वारकरी संप्रदायाने मोठी परंपरा निर्माण केली आहे.

### 02.04 श्रीमद्भागवतातील भक्ती

श्रीमद्भागवत प्रपंच आणि परमार्थ यांचा समन्वय साधणारे शास्त्र आहे. भागवतात सांगितले आहे की, घरात रहा, आपले कामधंदे करा. तरीही तुम्ही परमेश्वराला प्राप्त करू शकता, घरात राहणे पाप नाही. परंतु, घर मनात ठेवणे पाप आहे. श्रीमद्भागवतात असे सांगितले आहे की, आपला प्रत्येक व्यवहार भक्तिमय होईल. आपापल्या घरात राहूनही तोच आनंद मिळेल जो आनंद योगी वनात राहून भोगतात. योगी ज्या आनंदाचा अनुभव समाधीत घेतात त्याच आनंदाचा अनुभव सामान्य गृहस्थाश्रमीला मिळावा यासाठीच भागवत शास्त्राची रचना झालेली आहे. संसारातील विषयसुखाबद्दल वैराग्य आणि प्रभुविषयी अति प्रेम जागावे हाच भागवताच्या कथालीलांचा उद्देश आहे. संपूर्ण भागवतातील कथांत नवविधाभक्तीच सांगितलेली आहे.

'श्रीमद्भागवत' तर भक्तीचा सागरच आहे. त्यातील भक्तीमाहात्म्य सांगणाऱ्या कथा अवर्णणीय आहेत. या कथांतूनच 'भागवतात' नवविधा भक्ती सांगितल्या आहेत. ज्या संसारात राहून शक्य आहेत. श्रवण, कीर्तन, विष्णोस्मरण, पादसेवन, अर्चन, वंदन, दास्य, सख्य, आत्मनिवेदन या नऊ प्रकारच्या भक्ती कर्तव्यकर्मे करतांनाही करणे शक्य आहे. भगवद्गीतेच्या मार्गानेच भागवत जाते. हे प्रत्यक्ष भगवंताने सांगितल्यामुळेच त्याला 'भागवतमार्गही' म्हटले जाते. आजही हा 'भागवतधर्म'–'भागवतसंप्रदाय' अथवा 'वारकरी संप्रदाय' नावाने अस्तित्वात आहे.

### समारोप

एकूणच वेदांनी पूजा–विधी, यज्ञयागादींनी देवतांचे पूजन केलेले आहे. त्यात स्तुती, प्रार्थनांचा अंतर्भाव होतो. यासाठीही त्या 'पूज्या'वर श्रध्दा असणे, त्याच्यावर विश्वास असणे जरूरीचे आहे. वैदिक ऋषींची हीच श्रध्दा व विश्वास होता. त्यामुळे, वैदिक कर्मे ते पार पाडीत. पण, परमात्मा प्राप्त व्हावा, मुक्ती मिळावी ही त्यांची भूमिका यामागे नव्हती. ते सर्व मानवांच्या कामना पूर्ती होण्यासाठी पूजा–विधी करत. एकप्रकारे 'सहैतुकी भक्ती' करत. त्यात शुध्द भक्तीच्या भावना आढळत नाहीत.

नंतरचा ब्राह्मणकाल. या काळात यज्ञयागादी कर्मकांड व मंत्र–तंत्रांचे अवडंबर माजले होते. त्याचा अतिरेक झालेला होता. उपनिषद्काल व ब्राह्मणकाल यांत फारसे अंतर नाही. त्यामुळे हा अतिरेक टाळण्यासाठी उपनिषद्कालीन ऋषी–मुनींनी आत्मचिंतनावर भर दिला. कर्मकांडांना नाकारले. त्याचबरोबर ज्ञान व योगाला महत्त्व दिल्याने अर्थातच कर्तव्यकर्मे नाकारली. संन्यास मार्गाचे महत्त्व सांगितले. अव्यक्तोपासनेसारख्या कठीण मार्गाचा अवलंब केला. तो सर्वसमावेशक नव्हता. प्रेमरूप, रसरूप आत्म्याचा शोध या मार्गाने लागला. तरीही या मार्गाची कठीणता पाहता सामान्य माणसाला तो आचरण्यासारखा नाही. मानवी धर्माचे पालन करणारा नाही. 'श्रीमद्भगवद्गीता' तर कर्म नाकारत नाही. उलटपक्षी कर्तव्यकर्म करण्यावर भर देते. पण, त्या कर्तव्यकर्माच्या फलाची अपेक्षा न करता ती पार पाडणे याला महत्त्व देते.

भारतीय आध्यात्मिक तत्त्वज्ञानातील भक्तीसाधनेच्या विकासात भागवतधर्माची कामगिरी डोळे दिपवून टाकणारी आहे. हा वैदिक धर्म आहे. "वैदिक यज्ञ, नारायणीय पुरूषसूक्तातील आणि शतपथ ब्राह्मणातील सर्वात्मभाव व्यक्तविणारा यज्ञ, छोदोग्योपनिषदातील जीवनयज्ञ आणि गीतेतील निष्काम कर्मयोग या क्रमाने भक्तीमार्ग अवतरला." अशाप्रकारे भगवद्गीता आणि भागवत सारखाच उपदेष करतांना दिसतात.भगवद्गीतेच्या मार्गानेच भागवत जाते. हे प्रत्यक्ष भगवंताने सांगितल्यामुळेच त्याला 'भागवतमार्गही' म्हटले जाते. आजही हा 'भागवतधर्म'–'भागवतसंप्रदाय' अथवा 'वारकरी संप्रदाय' नावाने अस्तित्वात आहे.

### संदर्भ टीपा


01. साळुंखे आ.ह., 'मराठी विश्वकोश, खंड 12', (संपा.) जोशी लक्ष्मणशास्त्री, (प्रका.) सचिव, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई, 1985, पृ. 07.
02. जोशी महादेवशास्त्री (संपा.), 'भारतीय संस्कृतिकोश, खंड 6 वा', भारतीय संस्कृतिकोश मंडळ, पुणे, पृ..........
03. केतकर श्री.व्यं., 'महाराष्ट्रीय ज्ञानकोश, विभाग 18 वा', (प्रका.) महाराष्ट्रीय ज्ञानकोश मंडळ नागपूर, पृ. 01.
04. जोषी गजानन नारायण, 'भारतीय तत्त्वज्ञानाचा बृहद् इतिहास, खंड 4 था', शुभदा सारस्वत प्रकाशन, पुणे, 1994 पृ. 406.
05. जावडेकर मुरलीधर, 'साहित्यातील प्रीती आणि भक्ती – प्रगत समीक्षा', नूतन प्रकाशन, पुणे. पृ.240
06. तत्रैव पृ.242
07. शर्मा राममूर्ती, 'अद्वैत वेदान्त – इतिहास तथा सिध्दान्त', नेशनल पव्लिशिंग हाऊस, 1972 पृ. 283, 84
08. साळुंखे आ.ह., उनि.
09. जोषी महादेवशास्त्री, उनि. पृ.358.
10. गायधनी रं.ना., 'प्राचीन भारताचा सांस्कृतिक इतिहास ', 1891, पृ. 27, 28.
11. गायधनी रं.ना., उनि., पृ.51.
12. पेंडसे शं.दा., 'महाराष्ट्राचा सांस्कृतिक इतिहास', सुविचार प्रकाशन मंडळ, पुणे, 1965, पृ. 57.
13. पेंडसे शं.दा., उनि., पृ. 87.
14. तत्रैव.





**Lahare Maya Narayan**
Assistant Professor, Dept. of Marathi, Ashok Gramin Shikshan Sanstha's, Arts, commerce & Science College, Ashoknagar,Tal. Shrirampur, Dist. Ahmednagar.

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Books Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- Directory Of Research Journal Indexing
- International Scientific Journal Consortium Scientific
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- DOAJ
- EBSCO
- Crossref DOI
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database

Review Of Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.ror.isrj.org